# कुलाबा दर्पण

सवलतीच्या दरात पोस्ट करण्याचा
[redacted]पी-१२/०९-११

नवी मुंबई व रत्नागिरि कुलाबा दर्पण रविवार, १७ मे [redacted]


# विश्वअग्निहोत्र दिवस



चित्रांगणा रांगणेकर

अक्कलकोट निवासी सत्यधर्म प्रणेता परमसद्गुरू श्री गजानन महाराज यांनी आपल्या तपाचरणाने वेदवाङ्मयाचे सार सर्वांना सुलक्ष शब्दात व सोप्या भाषेत सांगितले. वेद शब्दाचा अर्थ ज्ञान. पंचसाधन मार्ग हा या ज्ञानभांडाराचे सार - यज्ञ, दान, तप, कर्म आणि स्वध्याय. पंचसाधन मार्ग - सुखशांती, समृध्दी, आरोग्य व पर्यावरणासाठी यज्ञ - नित्य अग्निहोत्र दान -ज्ञानाची व चांगल्या वचारांची देवाण घेवाण तप-सत्य-अहिंसा, दया इ. दशआज्ञांचे पालन करणे कर्म-असे कर्म अवलंबिणे. जेणे करून दुसऱ्याला त्रास, दुःख होणार नाही याची काळजी घेणे.

**स्वाध्याय** - ईश्वरी मांगल्य असणारे विचार यांचे चिंतन करणे उत्तरोत्तर स्वतःची उन्नती करून घेणे. अग्निहोत्र विधी - विश्वमानवाच्या सुखी व स्वस्थ जीवनासाठी तसेच सृष्टीचा व्यवस्थित कार्यरत राहण्यासाठी वेदाने अग्निहोत्र विधी कथन केला आहे. स्थानिक सूर्योदय व सूर्यास्त समयी पिरॅमिड सदृश्य आकाराच्या तांब्याच्या अथवा मातीच्या पात्रात गाय बैलाच्या गोवऱ्यापासून तयार केलेल्या गाईच तूप किंवा गुग्गूळ याने प्रज्वलित केलेल्या अग्नित दोन चिमूट अखंड तांदळांस दोन चार थेंब गाईचे तूप माखून दोन मंत्रोच्चारासह दोन आहुती देणे. अग्निहोत्राचे मंत्र -

सूर्योदय : सूर्याय स्वाहा । सूर्याय इदं न मम । (पहिली आहुती) प्रजापतये स्वाहा । प्रजापतये इदं न मम । ( दुसरी आहुती) सूर्यास्त : अग्नये स्वाहा। अग्नये इदं न मम । ( पहिली आहुती) प्रजापतये स्वाहा । प्रजापतये इदं न मम । (दुसरी आहुती) अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ यांनी आपल्या आगमनानेच (इ.स.१८५६) धर्मपीठ स्थापन केले. त्यांच्या महानिर्वाणानंतर त्यांचे परमशिष्य श्री बाळाप्पामहाराज यांना स्वतःकडील प्रासादिक वस्तू देऊन मठस्थापनेचा आदेश दिला. तो मठ म्हणजे १९०१ साली स्थापन केलेले 'गुरूमंदिर'. ३२ वर्षे स्वामी भक्तीचे प्रचार कार्य केल्यानंतर मठाचे उत्तराधिकार सद्गुरू गंगाधर महाराज यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यांनी संपूर्ण भारतभर संचार करून स्वामी भक्तीचा व कार्याचा २८ वर्षे प्रचार केला. या गुरुपीठावरील चौथे महापुरुष परमसद्गुरू श्री गजानन महाराज (श्रीजी) यांना उत्तराधिकारी नेमून गुरुगादीची सुत्रे त्यांच्याकडे सोपविली परमसद्गुरू वीस वर्षांचे असल्यापासून (इ.स. १९३८ ते १९८७) सत्यधर्मांचे कार्य या पीठावरून करून स्वामींचे धर्मकार्य पुढे नेले. ५० वर्षे कार्य केल्यानंतर मठाचे उत्तराधिकार परमसद्गुरू श्री गजानन महाराज यांचे सुपुत्र पूज्य श्रीकांतजी महाराज यांच्याकडे सोपविण्यात आले. (इ.स.१९८७ते २००७). सत्यधर्माचे (श्रीजींचे) कार्य हेच आपले जीवनध्येय मानून ते सतत कार्यरत राहीले या कार्यकालात त्यांनी '१२ मार्च विश्वअग्निहोत्र दिवस' स्थापित केला व आपले पिता 'श्रीजी' यांच्या जीवनावर 'वैश्वानर अवतार' हा महान ग्रंथ लिहिला. श्रीजींनी स्थापन केलेल्या 'वेद विज्ञान अनुसंधान संस्था', शिवपुरी, अक्कलकोट (**Institute of studies in Vedic Sciences**) या संस्थेचे पंचसाधनमार्ग व अग्निहोत्र प्रचार प्रसाराच कार्य जगभरातील लोकांना समजावून सांगितलं. अक्कलकोट येथे श्री शारदामात इंग्लिश मिडिअम स्कूल स्थापन केले. २० वर्ष कार्याकालानंतर मठाचे उत्तराधिकार पूज्य श्रीकांतजी महाराज यांचे सुपुत्र पूज्य पुरूषोत्तमजी महाराज (इ.स. २००७ पासून) यांच्याकडे सोपविण्यात आले. यांचे शिक्षण पुण्यामध्ये एम.डी. आयुर्वेद मध्ये झाले आहे.आपला प्रत्येक श्वास श्रीजींच्या कार्यासाठीच आहे

अशी त्यांची धारणा आहे. त्याप्रमाणे वय वर्षे २७ पासून त्यांनी गुरूमंदिर मठ, वेदविज्ञान अनुसंधान संस्था व धर्मात्मा तात्याजी महाराज मेमोरिअल मेडिकल रिलिफ ट्रस्ट या सर्व संस्थांचे कार्य व पंचसाधन मार्ग प्रचार प्रसार व कार्याचे सुसुत्रीकरण तसेच परमसद्गुरू श्री गजानन महाराज व त्यांच्या पत्नी सौ. शारदामाता व त्यांचे सुपुत्र पू. श्रीकांतजी महाराज यांच्या स्मारक उभारणीचे कार्य हाती घेतले आहे. श्रीजींचे सर्वात महत्वाचे एकमेव त्यांची कर्मभूमी असलेले जागतिक स्मारक शिवपुरी अक्कलकोट येथे उभारले जात आहे. परमसद्गुरूंना भगवान परशुरामांनी १२ मार्च १९४२ रोजी त्रिपुरीमंत्राची दिक्षा दिली. त्यानंतर पुढे अडीच वर्षांनी भगवानांनी त्यांच्याकडून दक्षिणा म्हणून वेदांच्या पूनरूज्जीवनाची अपेक्षा केली. त्याप्रमाणे १९४४ च्या विजयादशमीला आपल्या सद्गुरूच्या चरणावर उदक सोडून त्यांनी 'मी श्रुतींचे (वेदांचे) पुनरूज्जीवन करीन', ही प्रतिज्ञा करून वेदधर्मांचे विधिवत् पुनरूज्जीवन केले.

त्याच दिवशी 'सप्तश्लोकी' स्वरूपात वेदधर्माचे स्पष्टीकरण लोकहितार्थ केले. तीत असे सांगितले की, १) वेदधर्म हाच विश्वधर्म होय २) विश्वातील सर्वांचा धर्म एकच होता व एकच आहे. ३) वेदधर्म सर्वांसाठी आहे, सर्वच त्याचे आचरण करू शकतात. ४) सुख, समृद्धी व वैश्विक शांती ही त्याची अंतिम उद्दिष्टे आहेत. ५) वेदांनी सर्वांसाठी दिलेला आचार म्हणजे यज्ञ,दान,तप,कर्म आणि स्वाध्याय. ६) रोज केवळ दोन आहूतींनी (गाईचे तूप लावलेल्या केवळ दोन चिमटी अक्षत तांदळांनी) सकाळ - संध्याकाळ केली जाणारी घराच्या चार भिंतीतील कौटुंबिक उपासना हे त्या यज्ञतत्वाचे पायाभूत स्वरूप. ७) स्त्री- पुरूष अशी कोणीही व्यक्ती ही उपासना करू शकते. त्यात जातपात, वय, वर्णभेद, पंथभेद अशा भेदांना वाव नाही. ८) मानवसमाज एकच आहे.

त्याची उपासना एकच आहे. ती सर्वांना करता येते. तीत भेदभाव नाही. तीत् कोणतेही अवडंबर नाही. ९) अग्निहोत्र वातावरणात मनावरील ताणतणाव दूर होऊन मनशांती व प्रसन्नता लाभून स्वास्थ व कल्याणकारक चा कार्यरत राहते. मनोबल वाढीसाठी व व्यसन मुक्त होण्यासाठीही ते फारच उपयुक्त ठरते. निर्सग शेतीसाठी अग्निहोत्र व त्याचे भस्म यांचा उत्तम उपयोग होतो. सारांश सप्तश्लोकी व तिचे स्पष्टीकरण यातून परमसद्गुरू श्री गजानन महाराज यांनी धर्माच्या संदर्भातील सर्व अवडंबर संपवून हा पायाभूत आचारधर्म प्रत्येकाच्या स्वाधीन केला. आपल्या तपोबलाने त्यांनी तो प्रस्थापित केला. आज जगाच्या कानाकोपऱ्यात तो पसरलेला आहे.

*(वेद विज्ञान अनुसंधान संस्था, शिवपुरी, अक्कलकोट, वेद अग्निहोत्र सेंटर, दादर,०२२ - २४३०११४९)